
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ 08 मार्च 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 251 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024




थोडक्यात महत्वाचे

## जागतिक महिलादिनानिमित्त राज्यात विशेष ग्रामसभांचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, ता. ७ :** जागतिक महिलादिनानिमित्त शनिवारी (ता. ८) राज्यभरातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात येणार आहे. त्यामध्ये महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या संपल्पनेनुसार बालविवाह रोखणे, विधवा प्रथा बंद करणे, तसेच महिला सुरक्षिततेसाठीचे ठराव या ग्रामसभांमध्ये मांडण्यात येणार आहेत. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने केलेल्या मागणीनुसार ग्रामविकास विभागाने राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना महिलादिनानिमित्त सर्व ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्रामसभा आयोजित करण्याचे निर्देश दिले आहेत. याबाबत बोलताना महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर म्हणाल्या की, 'पुरोगामी व प्रगत राज्य असलेल्या महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर बालविवाह होत आहेत, महिला सर्वच क्षेत्रात आघाडीवर असतानाही, विधवा महिलांना रूढी व अंधश्रद्धेमुळे जाचक प्रथांना सामोरे जावे लागते आहे, सोबतच महिलांच्या सुरक्षिततेसाठी व्यापक स्तरावर जनजागृती व्हावी, यासाठी विशेष ग्रामसभा बोलावून गावात बालविवाह होऊ न देणे, पतीच्या निधनानंतर महिलांना जाचक असणाऱ्या प्रथा बंद करणे, गावात मुलींचा जन्मदर वाढावा यासाठी प्रयत्न करणे आणि महिलांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करणे, असे ठराव करण्यात यावेत, अशी आयोगाची संकल्पना आहे. संपूर्ण गावात असे ठराव शासकीय पातळीवर झाल्यास जनसामान्यांच्या मनात महिलांना सन्मानाने वागवणे ही कर्तव्य भावना रुजवता येईल. महिलांना सन्मानाची वागणूक देत त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनही अशा प्रयत्नांतून बदलेल म्हणून आयोगाने ही संकल्पना मांडल्याचे चाकणकर यांनी सांगितले.

## मीरा-भाईंदर पालिका आयुक्तपदी राधाबिनोद शर्मा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदरः** मीरा-भाईंदर महापालिका आयुक्त संजय काटकर यांची तडकाफडकी बदली करण्यात आली असून त्यांच्या जागी महापालिका आयुक्तपदी राधाबिनोद शर्मा या एमएमआरडीएतील सह आयुक्तपदी कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे. व्ही. राधा, अप्पर मुख्य सचिव यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत. नवी मुंबई सिडको येथे आयुक्तपदी कार्यरत असताना ९ ऑगस्ट २०२३ रोजी मीरा-भाईंदर महापालिका आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आलेल्या संजय काटकर यांनी संध्याकाळी महापालिका आयुक्त पदाचा पदभार स्विकारला होता. अवघ्या दीड वर्षाच्या काळात संजय काटकर यांनी धडाकेबाज निर्णय घेत महापालिकेचा आर्थिक डोलारा सावरण्याचा प्रयत्न केला. मात्र नाविन्यता कक्षासह काही वादग्रस्त निर्णयामुळे आयुक्त काटकर यांना काही राजकीय रोषाला सामोरे जावे लागले. नाविन्यता कक्षातील नियुक्त्यांना शासनमान्यता नसल्याने तसेच दरमहा सुमारे १५ लक्ष रुपये या तैनाती फौजेसाठी खर्च होत असल्याने प्रसिध्दी माध्यमांनी आवाज उठविला होता.

आयुक्त प्रशिक्षणासाठी शहराबाहेर असतानाच अचानक बदलीचा आदेश जारी करण्यात आला असून महापालिका आयुक्तपदाचा कार्यभार राधाबिनोद शर्मा या आयएएस अधिकाऱ्याकडे सोपविला आहे.

# अनिल परबांच्या वक्तव्यामुळे नवा वाद

,"छत्रपती संभाजी महाराजांबद्दल सत्ताधारी बाकावरून बरेच बोलले गेले. धर्म बदलण्यासाठी त्यांच्यावर दबाव आणला. त्यांचे डोळे काढले, हात-पाय छाटले. छत्रपती संभाजी महाराजांनी शेवटपर्यंत धर्म बदलला नाही. ते आपल्या मतावर ठाम राहिले. छळ झाला तरी दबावाला बळी पडले नाही. छत्रपती संभाजी महाराजांचा वारसा मी चालवला आहे. पक्ष बदलण्यासाठी माझा छळ झाला. ईडीची नोटीस, सीबीआय, प्राप्तिकर विभाग अशी विविध कारवाई माझ्यावर करण्यात आली. मी पक्ष बदलला नाही, याचा मला अभिमान वाटतो. जे पक्ष बदलून गेले, ते आता आम्हाला छत्रपती संभाजी महाराजांचा वारसा सांगत आहेत ?
- अनिल परब



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्यामध्ये अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु आहे. रोज नवीन मुद्द्यांवरुन राजकारण रंगते आहे. आज राज्याचा अर्थिक अहवाल सादर होणार आहे. मात्र त्यापूर्वी शिवसेना ठाकरे गटाचे नेते अनिल परब हे चर्चेत आले आहे. अनिल परब यांनी छत्रपती संभाजी महाराजांप्रमाणे माझा देखील छळ झाला असल्याचे वक्तव्य केले आहे. यामुळे आता राजकीय वर्तुळामध्ये नवीन वादाला तोंड फुटले आहे. छावा चित्रपट हा देशभरामध्ये धुमाकूळ घालतो आहे. तसेच बलिदान मास सुरु असल्यामुळे छत्रपती संभाजी महाराजांना आदरांजली वाहिली जात आहे. मात्र शिवसेना ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनी त्यांची तुलना छत्रपती संभाजी महाराजांसोबत केली आहे. यामुळे सत्ताधारी आमदारांनी गदारोळ घातला आहे. विधान परिषदेचे आमदार अनिल परब यांनी शिवसेना ठाकरे गट न सोडल्याचे सांगत आमचा देखील संभाजी महाराजांप्रमाणे छळ झाला असल्याचे म्हटले आहे.



### मी अनिल परब यांचा धिक्कार करतो - प्रविण दरेकर

जे झालय त्यात आपण कस योग्य आहे, हे मगलूरीच आहे की शंभूराजे कुत्र्याचं नाव पुन्हा त्याठिकाणी पिजन बॉक्सला कबुतराच्या भोकात गेलेल्याचं समर्थन. सभापती महोदय हे कुठल सभागृह आहे? असा प्रश्न प्रविण दरेकरांनी केलेला आहे. तसेच पुढे दरेकर म्हणाले की, त्यांनी जे केल आहे त्यांना ते कोणत्याही ठिकाणी चुकीच केलं आहे अस वाटत नाही आहे. आम्ही हे खपवून घेणार नाही. छत्रपती शंभूराजे यांच्या विषयी बोलल्यानंतर आता ते प्रकरण तुमच्यावर ढकलत आहेत. तुम्ही जी तुलना केली आहे त्यात तुमची काय लेव्हल आहे का?", असं म्हणत प्रविण दरेकरांनी अनिल परबांवर हल्लाबोल केला आहे.

### भाजपाकडून तीव्र निषेध

"अनिल परब यांनी स्वतःची तुलना छत्रपती संभाजी महाराजांशी केली. पण त्यांना मी सांगू इच्छितो की, छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज माझ्या हृदयात आहेत. म्हणूनच संगमेश्वर येथील सरदेसाई वाडा अधिग्रहीत करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे", असे विधान भाजपाचे आमदार अमित गोरखे यांनी आपल्या विधानपरिषदेतील भाषणात केले. तसेच भाजपाकडून शुक्रवारी (७ मार्च) अनिल परब यांच्या विधानाच्या विरोधात निषेध



# ठाणे महापालिकेचा अर्थसंकल्प सादर



## कोणतीही दरवाढ नाही काटकसरीवर भर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** कोणत्याही स्वरुपाची करवाढ अथवा दरवाढ नसलेला, २०२५-२६ चा ६६ लाख शिलकीसह ५६४५ कोटींचा अर्थसंकल्प शुक्रवारी ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी सादर केला. यात ३७२२ कोटी ९३ लाख महसुली खर्च आणि १९२१ कोटी ४१ लाख भांडवली खर्चाचा समावेश आहे.

नव्याने हाती घेण्यात आलेले प्रकल्प हे पीपीपी तत्वाव राबवून पालिकेच्या तिजोरीवर कोणत्याही स्वरुपाचा भार न देता काटकसरीचा हा अर्थसंकल्प असल्याचे आयुक्तांनी यावेळी स्पष्ट केले. विशेष म्हणजे मागील वर्षी अनुदानापोटी २८४ कोटी अपेक्षित धरण्यात आले असतांना ९१४ कोटींचे अनुदान मिळाल्यानेच यंदाच्या अर्थसंकल्पात ६२० कोटींची वाढ दिसून आली आहे. २०२४-२५ चे ५०२५ कोटी १ लाख चा मुळ अर्थसंकल्प सुधारीत करुन आरंभिच्या शिल्लकेसह ६५५० कोटी व २०२५-२६ च्या आरंभिच्या शिल्लकेसह ५६४५ कोटीचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. कोणतीही करवाढ नसणारा काटकसरीचा अर्थसंकल्प, महसुली उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न, खर्चामध्ये वित्तीय शिस्त, पोषक व शाश्वत पर्यावरणाकरीता उपाययोजना, गतिमान वाहतुकीसाठी पायाभुत सुविधांची कामे, महापालिका शाळांचा कायापालट व गुणवत्तापूर्ण शिक्षण, महिला जेष्ठ नागरीक, दिव्यांग यांच्यासाठी कल्याणकारी योजनांवर भर, प्रशासकीय कामकाजामध्ये पारदर्शकता व कार्यक्षमता यावर भर, कामांचा दर्जा उत्तम राहावा यासाठी लक्ष, वृक्षगणना व वृक्षसंवर्धन ही या अर्थसंकल्पाची प्रमुख वैशिष्ट ठरली आहेत.

### महापालिकेच्या तिजोरीवर भर कमी

**अर्थसंकल्प सादर करतांना यापूर्वी शासनाकडून ज्या ज्या विकासकामांसाठी निधी मंजुर झाला आहे, किंवा मिळाला त्या कामांचा अर्थात कळवा हॉस्पीटल, गडकरी रंगायतन, तलाव संवर्धन आणि सुशोभिकरण, हरित ठाणे उपक्रम, एकात्मिक उद्यान विकास प्रकल्प आदींसह इतर प्रकल्पांचा उल्लेख करण्यात आला आहे.**

१ वाहतुक कोंडी मुक्त, खड्डेमुक्त ठाणे वाहतुक कोंडी मुक्त ठाणे करण्यावर आगामी काळात भर दिला जाणार असून, त्यात एमएमआरडीएच्या माध्यमातून सुरु करण्यात येणाऱ्या ठाणे घोडबंदर रस्त्यांचे दोन्ही बाजूच्या सर्व्हीस रस्त्यांचे मुख्य रस्त्यामध्ये समावेश,

२ घाटकोपर ते ठाणे दरम्यान इर्स्टन फ्री वेचा विस्तार, आनंद नगर ते साकेत उन्नत मार्ग, ठाणे शहर व कोपरी पूर्व वागळे इस्टेटला जोडणे, अंतर्गत मेट्रो, मुख्य मेट्रो, ठाणे बोरीवली टनेल, कोस्टल रोड आदींच्या कामांमुळे येत्या काळात ठाणे वाहतुक कोंडी मुक्त होईल असा विश्वास आयुक्तांनी व्यक्त केला आहे.

३ येत्या पावसाळ्यात खड्डेमुक्त रस्ते देण्यावर भर देण्यात येणार आहे. मागील वर्षी ठाणे महापालिकेने अनुदानापोटी २८४ कोटी अपेक्षित धरले होते. परंतु प्रत्यक्षात पालिकेला ९१४ कोटी अनुदानापोटी मिळाल्याने आता पुन्हा २०२५-२६ मध्ये ६१२ कोटी ५९ लाख इतके अनुदान अपेक्षित धरले आहे.

४ पायाभुत सुविधांसाठी ३०० कोटी, कळवा रुग्णालय ३ कोटी, एकात्मिक स्मशानभुमी नुतनीकरण १० कोटी, सार्वजनिक शौचालय बांधकाम १२ कोटी १९ लाख, १५ वा वित्त आयोगा २६ कोटी, एमएमआरडीएकडून १ कोटी, नागरी सेवा सुविधांसाठी २५ कोटी, अमुत योजना २ साठी ४८ कोटी ५२ लाख, राज्य सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत तलावांचे संवर्धन ५ कोटी ६२ लाख

# भिवंडीची वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पालिका आयुक्त ॲक्शन मोडवर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** भिवंडी शहरातील वाहतुक कोंडीच्या विळख्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहे. नव नियुक्त महापालिका आयुक्त अनमोल सागर यांच्याकडेही नागरिकांच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर अनमोल सागर यांनी महापालिका अधिकारी आणि ठाणे पोलिसांसोबत बैठक आयोजित करुन वाहतुक कोंडी आणि इतर वाहतुक समस्येविषयी महत्त्वपूर्ण सूचना केल्या. शहरातील वाहतुक कोंडीवर उपाय योजना करण्यासाठी एक कृती समिती गठीत करण्यात येणार आहे. ही समिती येत्या दोन आठवड्यात भिवंडीच्या वाहतुक समस्या आणि उपाययजोना संदर्भाचा अहवाल सादर करणार आहे. भिवंडी शहरातून मोठ्या प्रमाणात हलक्या वाहनांची वाहतुक होते. तसेच भिवंडीत गोदामांची संख्या अधिक असल्याने गुजरात आणि उरण जेएनपीटीहून येणारी अवजड वाहने देखील शहरात वाहतुक करतात. मुंबई नाशिक महामार्ग, कशेळी- भिवंडी रोड हे महत्त्वाचे मार्ग देखील शहरातून जातात. असे असले तरी रस्त्यांची स्थिती चांगली नसल्याने अतिक्रमण, बेशिस्त वाहतुकीमुळे दररोज नागरिकांना कोंडीचा सामना सहन करावा लागत आहे. काही दिवसांपूर्वीच भिवंडी महापालिकेत अनमोल सागर यांची नियुक्ती झाली आहे. भिवंडीत वाहतुक समस्येविषयी नागरिकांच्या तक्रारी त्यांना प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे गुरुवारी ठाणे पोलीस विभाग आणि महापालिका अधिकाऱ्यांसोबत अनमोल सागर यांची महत्त्वपुर्ण बैठक पार पडली. आयुक्त सागर यांनी या बैठकीमध्ये शहरामध्ये वाहतुक कोंडीची ठिकाणे, रस्त्यावरील अतिक्रमण, वाहन तळासाठी जागा निश्चिती इत्यादी बाबींचा आढावा घेतला.



## अवैध धंद्यांविरोधात आ. कुमार आयलानींचे मुख्यमंत्र्याकडे साकडे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** शहारातील तीन मटका जुगार अड्डयावर गुरुवारी पोलिसांनी धाड टाकून ७ जणावर गुन्हा दाखल झाला. पोलिसांनी त्यांच्याकडून जुगाराचे साहित्य व रोख रक्कम जप्त केली असून आमदार कुमार आयलानी यांनी अवैध धंद्याबाबत थेट मुख्यमंत्री यांच्याकडे साकडे घातले आहे. उल्हासनगरात मटका जुगार, तीन पाणी जुगार, ऑनलाईन लॉटरी जुगार, गावठी दारू अड्डे याची भरमार झाल्याचे चित्र आहे. पोलीस दररोज मटका जुगार अड्डयावर धाडी टाकूनही त्यांची संख्या कमी होण्या ऐवजी वाढत आहे.



# उत्पन्नापेक्षा खर्च जास्त

## राज्याचे आर्थिक संकट वाढणार?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** आमदनी अठन्नी खर्चा रुपैया', या म्हणीप्रमाणे राज्य सरकारचे कामकाज सुरु आहे. यामुळे राज्यासमोर आर्थिक संकट वाढले आहे. महसुली उत्पन्नापेक्षा राज्याचा खर्च जास्त होत आहे. कर्ज आणि व्याजापोटी मोठी रक्कम खर्च होत आहे. यामुळे भांडवली खर्चासाठी दुसरे कर्ज काढण्याशिवाय पर्याय नाही, असा राज्याची गंभीर आर्थिक परिस्थिती मांडण्यात आली आहे. आर्थिक पाहणी सर्वेक्षण अहवालातून राज्याची बिकट परिस्थिती समोर आली आहे. उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांच्याकडून विधिमंडळात हा अहवाल मांडण्यात आला.

### काय आहे आर्थिक सर्वेक्षण अहवालात

- २०२४-२५ साठी राज्याची महसुली जमा ४ लाख ९९ हजार ४६३ कोटी रुपये अपेक्षित तर महसुली खर्च ५ लाख १९ हजार ५१४ कोटी
- कर, महसूल आणि करेतर महसूल (केंद्रीय अनुदानासह) अनुक्रमे ४ लाख १९ हजार ९७२ कोटी आणि ७९ हजार ४९१ कोटी अपेक्षित

### उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांच्याकडून विधिमंडळात आर्थिक पाहणी अहवाल सादर

- २०२४-२५ मध्ये जानेवारी पर्यंत प्रत्यक्ष महसुली जमा ३ लाख ८१ हजार ८० कोटी रुपये ही रक्कम अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ७६.३ टक्के आहे.
- अर्थसंकल्पीय अंदाजानुसार २०२४-२५ करिता राज्याचा महसुली खर्च ५ लाख १९ हजार ५१४ कोटी अपेक्षित आहे.
- स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत कर्ज आणि व्याजापोटी १७.३ टक्के रक्कम खर्च होत आहे.
- सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार राजकोषीय तूट २.४ टक्के, महसुली तुट ०.४ टक्के असणार आहे.
- २०२४-२५ करिता राज्याचा प्राधान्य क्षेत्रासाठीचा वार्षिक कर्ज आराखडा ७ लाख २५ हजार कोटी रुपये असणार आहे. त्यामध्ये कृषी क्षेत्राचा हिस्सा २४.४ टक्के आणि 'सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग' क्षेत्राचा हिस्सा ६०.७ टक्के आहे.







# बारावीच्या उत्तरपत्रिका रस्त्यावर?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** राज्यात सध्या बारावीच्या परीक्षा सुरु आहेत. अशातच कामोठे वसाहतीत बारावीच्या उत्तरपत्रिकेचा अख्खा संचच रस्त्यावर सापडला असून, 28 मार्च रोजी पार पडलेल्या परीक्षेच्या या उत्तरपत्रिका आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार मनसे महिला आघाडीच्या पदाधिकारी स्नेहल बागल यांना हा संच सापडल्या नंतर या बाबतची माहिती त्यांनी कामोठे पोलीस ठाण्यात दिली असून, सापडलेल्या उत्तरपत्रिका पोलिसांच्या ताब्यात दिल्या आहेत. एन परीक्षा काळात घडलेल्या या प्रकारामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी मनसेकडून करण्यात येणार असल्याची माहिती महिला आघाडीच्या प्रमुख आदिती सोनार यांनी दिली आहे.



दरम्यान याबाबत अधिक माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता कामोठे येथे राहणाऱ्या एका शिक्षकाकडून हे पेपर गहाळ झाले असल्याची माहिती संबंधित शिक्षकाने मुंबई विद्यापीठाला दिली असल्याची माहिती मुंबई विद्यापीठाकडून देण्यात आली आहे.

## गीतासार



**ज्ञानकर्मसंन्यासयोगः**

यदृच्छालाभसन्तुष्टो द्वन्द्वातीतो विमत्सरः । समः सिद्धावसिद्धौ च कृत्वापि न निबध्यते ॥ ४-२२ ॥

जो इच्छेशिवाय आपोआप मिळालेल्या पदार्थांत नेहमी संतुष्ट असतो, ज्याला मत्सर मुळीच वाटत नाही, जो सुख-दुःख इत्यादी द्वंद्वांच्या पूर्णपणे पार गेलेला आहे, असा सिद्धीत व असिद्धीत समभाव ठेवणारा कर्मयोगी कर्म करीत असून त्याने बांधला जात नाही. ॥ ४-२२ ॥

गतसङ्गस्य मुक्तस्य ज्ञानावस्थितचेतसः । यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते ॥ ४-२३ ॥

ज्याची आसक्ती पूर्णपणे नाहीशी झाली आहे, जो देहाभिमान आणि ममत्व यांनी रहित आहे, ज्याचे चित्त नेहमी परमात्म्याच्या ज्ञानात स्थिर आहे, अशा केवळ यज्ञासाठी कर्म करणाऱ्या माणसाची संपूर्ण कर्मे पूर्णपणे नाहीशी होतात. ॥ ४-२३ ॥

ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् । ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥ ४-२४ ॥

ज्या यज्ञात अर्पण अर्थात स्रुवा आदी ही ब्रह्म आहे आणि हवन करण्याजोगे द्रव्यसुद्धा ब्रह्म आहे, तसेच ब्रह्मरूप अशा कर्त्याच्या द्वारे ब्रह्मरूप अग्नीमध्ये आहुती देण्याची क्रियाही ब्रह्म आहे, त्या ब्रह्मकर्मात स्थित असणाऱ्या योग्याला मिळण्याजोगे फळसुद्धा ब्रह्मच आहे. ॥ ४-२४ ॥

## सौंदर्य टिप्स

### संत्र्याच्या सालीचे फायदे

१.अँटीऑक्सिडंट्स: संत्र्याच्या सालीत अँटीऑक्सिडंट्सचे प्रमाण खूप जास्त असते, जे त्वचेवर होणाऱ्या वृद्धत्वाच्या प्रक्रियेचा सामना करण्यास मदत करतात. हे त्वचेला लवचिक आणि ताजेतवानी ठेवते.


२.कोलेजन उत्पादन: संत्र्याच्या सालीमधील काही घटक असतात जे त्वचेत कोलेजन उत्पादन वाढवतात, ज्यामुळे त्वचा तरुण आणि ताणलेल्या दिसते.

३.डेड स्कीन काढुन त्वचा चनकदार करणे: संत्र्याच्या सालीतील घटक त्वचेमधूनडेड स्कीन बाहेर काढण्यास मदत करतात, ज्यामुळे त्वचेला सुधारणा होते आणि चेहरा चमकदार दिसतो.

**संत्र्याच्या सालीचे त्वचेसाठी वापर कसा करावा?**

1. संत्र्याच्या सालीचा फेस मास्क संत्र्याच्या सालीला थोडं कोरडं करून त्याचं पावडर बनवा. त्यात थोडं दूध किंवा गुलाब पाणी मिसळा. हा पॅक चेहऱ्यावर लावून 15-20 मिनिटे ठेवा आणि नंतर गार पाण्याने चेहरा धुवा. संत्र्याच्या सालीमध्ये असलेल्या व्हिटॅमिन C मुळे चेहऱ्यावर एक नैसर्गिक चमक येईल.
2. संत्र्याच्या सालीचा स्क्रब संत्र्याच्या सालीचा वापर स्क्रब म्हणून देखील करू शकता. संत्र्याच्या सालीला थोडं मध आणि चहा पावडर (ऑलिव्ह ऑईल किंवा बदाम तेल) घालून एक मऊ स्क्रब तयार करा. या स्क्रबचा वापर चेहऱ्यावर हलक्या हाताने करा, आणि मृत त्वचा काढा. यामुळे त्वचा मऊ आणि चमकदार बनेल.
3. संत्र्याच्या सालीचा टोनर संत्र्याच्या सालीच्या पावडरला थोडं गुलाब पाणी किंवा खाण्याचं लोणचं पाणी घालून टोनर तयार करा. या मिश्रणाचा वापर रोज चेहऱ्यावर केल्याने त्वचेला ताजेपणा आणि चमक मिळतो. यामुळे त्वचेची गडद डाग आणि दुरावा कमी होतो.

# जागतिक महिला दिन



ज्यांच्या चरणाची धूळ कुंकवाचा करंड्यात घेऊन भाळाला लावावी अशा राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊ आऊसाहेब, "चूल आणि मूल" या संकल्पनेतून मुक्त करून ज्यांनी स्त्रियांसाठी शिक्षणाचे द्वार उघडी करून देणाऱ्या अशा सर्वांच्या लाडक्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, "मेरी झाशी नही दूंगी" अशी गर्जना करत बलाढ्य अशा शत्रू इंग्रजांना नामोहरण करून जेरीस आणणाऱ्या राणी लक्ष्मीबाई, दिल्लीच्या बादशाह औरंगजेबाला रडविणाऱ्या महाराणी ताराबाई, भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कठीण परिस्थितीत धैर्याने साथ देणाऱ्या आपल्या रमाई माता, देशातील गोरगरिबांची सेवा करणाऱ्या करून स्वतःचे जीवन सार्थक करणाऱ्या मदर तेरेसा, अवकाशात भरारी घेत भारताचं आणि जगाचं नाव उज्वल करणाऱ्या कल्पना चावला, आपल्या गोड आवाजाने जगाचं आणि भारताचे नाव उंचावर नेणाऱ्या भारताची गान कोकिळा लता मंगेशकर, त्याचप्रमाणे आपल्या कर्तुत्वाने आणि पराक्रमाने स्वतःला सिद्ध करणाऱ्या, महिलांच्या अधिकार आणि हक्कासाठी सतत झटत असणाऱ्या आणि इतरांसाठी आपलं जीवन अर्पण करणाऱ्या आदरणीय माता-भगिनींना जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विनम्र अभिवादन आणि कोटी कोटी प्रणाम. आज 8 मार्च 2025 म्हणजे जागतिक महिला दिवस. या जागतिक महिला दिनाच्या आपल्या सर्व माता-भगिनींना आणि सर्व सखींना खूप खूप साऱ्या शुभेच्छा. अमेरिकेतील स्त्री कामगारांनी केलेल्या ऐतिहासिक कामगिरीच्या स्मरणार्थ 8 मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून स्वीकारावा असा एक प्रस्ताव कार्यकर्त्या क्लारा झेटकीन यांनी मांडला आणि तो अमेरिकेत पास झाला.

आणि तो दिवस म्हणजे 8 मार्च हा दिवस महिलांचा प्रति मान, सन्मान आदर, प्रेम व्यक्त करण्याच्या उद्देशाने संपूर्ण जगभरात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. हे खरोखर आपल्या सगळ्या महिलांसाठी भाग्याची गोष्ट आहे. त्यासाठी आपण क्लारा झेटकीन यांचे मनापासून आभार मानले पाहिजे.

आज महिला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून देण्यासाठी प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे. त्यासाठी तिच्या अंतर्मनातून येणारा आत्मविश्वास आणि धाडस तिला पाठबळ देत आहे हे तितकच खरं आहे. कारण आपल्या कर्तुत्वाने, जिद्दीने तिने स्वतःला सिद्ध केल आहे. तिची अशीच उत्तरा उत्तर प्रगती होओ यासाठी तिला खूप खूप साऱ्या शुभेच्छा.

आज आपण जागतिक महिला दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करीत आहोत, मोठ्या मोठ्या पदावर कार्यरत आहोत, प्रत्येकाला अभिमान वाटावा अशी कामगिरी करीत आहोत कोणामुळे बरं? हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात आला असेल नाही का? ज्या माऊलीमुळे आज आपण स्वाभिमानाने, सुखात, आनंदात जीवन आज जगत आहोत त्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या बद्दल म्हणेल,"सावित्री तुझे कणखर हात पत्थराला छातीठोक भिडले,तुझ्या खणखणीत वाणीने आमचं करंट पण मोडले, माणूस पण जपायला तू घातली गगनाला साथ, अमानवी नराधम प्रथेवर तू केली कायमची मात" या ओळीच साक्ष आहेत त्यांनी आपल्या सर्व स्त्रियांसाठी काय केले? किती हाल अपेष्टा सहन केल्या ? खरंच "धन्य धन्य ती माऊली जिच्यामुळे आम्हाला मिळाली सावली" या माऊलीला पुन्हा एकदा त्रिवार सलाम. "इतिहास सांगतो आमच्या स्त्रीने शत्रू तुडवला,लक्ष्मीबाईने झाशीचा किल्ला लढवला, जिजाऊने राजा शिवछत्रपती घडवला,महाराणी ताराबाईने महाराष्ट्र भूमीत औरंगजेब रडवला"हे आजही कोणी विसरू शकत नाही हे तेवढेच सत्य आहे. आणि एक गोष्ट सांगू ती ताकद, ते शौर्य,ते धाडस, तो पराक्रम आजही आपल्यात आहे तो फक्त आतून बाहेर आला पाहिजे मग कोणतीही परिस्थिती येऊ ती रणरागिणी लढायला सज्ज असते. "तुझ्या उत्तुंग भरारी पुढे गगनही ठेंगणे भासावे तुझ्या विशाल पंखाखाली विश्व ते सारे वसावे " सारं विश्व तुझ्या पंख्याखाली वसलेला आहे तर, अजून तुला काय हवंय? या जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून मी खरच म्हणेल, प्रत्येक महिला भगिनीने आहे त्या परिस्थितीत सकारात्मक राहून, मनाला समाधानी ठेवून, प्रत्येक अडचणी समस्याला धैर्याने तोंड देऊन. जीवनाचा प्रवास असाच पुढे चालू ठेवला पाहिजे. कारण जीवन हे आपल्याला एकदाच मिळणार आहे पुन्हा पुन्हा नाही ही गोष्ट कायमस्वरूपी लक्षात ठेवली पाहिजे. तरच आपण सुखी होणार आहोत. शांत राहणं हा तिचा स्वभावाचा भाग आहे वरून शांत असली तरी ती आतून आग आहे. हे मात्र कधी विसरू नका. वागणं तिचं एकदम खंबीर आणि सक्त आहे, कारण तिच्या अंगात जिजाऊंचा रक्त आहे. आणि म्हणूनच ती आज प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तुत्वाने झेंडा रोवत आहे यात तीळमात्र शंका नाही.

या दिनाच्या दिवशी मी माझ्या प्रिय सखींना एवढेच सांगेल, "ध्येय दूर आहे म्हणून रस्ता सोडू नका, मनात धरलेलं स्वप्न कधीच मोडू नका, पावलोपावली येथील कठीण प्रसंग, पण ध्येय पूर्ण होई पर्यंत हार मानू नका" आणि हो स्वतःसाठी वेळ काढा, एखादा छान आवडणारा छंद जोपासा, निदान एक तास तरी व्यायाम, प्राणायाम, योगा करा, शक्य असेल तेवढे कार्यरत राहा,सतत प्रयत्नशील राहा, इतरांची काळजी घेता घेता स्वतःची पण काळजी घ्या,आणि रोज एक नियम करा स्वतःवर प्रेम करा, स्वतःवर प्रेम करा.जाता जाता माझे सर्व प्रिय सखींसाठी ना कोई रहा आसान चाहिये। ना ही हमे कोई पहचान चाहिये। हम एकी चीज मांगते है भगवान से। आपके चेहरे पर हर पल एक प्यारी सी मुस्कान चाहिये।




- शब्दांकन-
सौं. रजनी राजेंद्र सोनवणे
(उपशिक्षिका)
उल्हासनगर मनपा शाळा क्रमांक २४


# वाशी खारेपाटातील महिलांचा पाण्यासाठी हेटवणे धरणावर मोर्चा

• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : गेले कित्येक वर्षे सातत्याने पिण्यासाठी व शेती सिंचनाचे पाणी मिळावे यासाठी पाठपुरावा व आंदोलन करून सुद्धा पेण तालुक्यातील खारेपाट भागाला पिण्याच्या व सिंचनाच्या पाण्यापासून वंचित ठेवले आहे. खारेपाट विकास संकल्प संघटनेच्या माध्यमातून वाशी येथे आमरण उपोषण सुरू केले होते तेव्हा शेती च्या सिंचनासाठी ७६६ मंजुर केले. सदर कामाचे हेटवणे मध्यम प्रकल्प चतुर्थ सुप्रमा मंजूरी नंतर १५ ऑक्टोबर २०२४ रोजी सदर कामाचे टेंडर उघडण्यात येऊनही कार्यारंभ आदेश न झाल्याने सदर मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी,आणि तीन दिवसांनी अनियमित पाणी पुरवठा.





या समस्येसाठी खारेपाटातील नागरिक हेटवणे धरणावर हंडा घेऊन ११ मार्च रोजी सकाळी. ९.३० वाजल्यापासून पाणी भरण्यासाठी जाणार आहेत. गेली कित्येक वर्षे सातत्याने पाठपुरावा करत संघर्ष करत हेटवणे मध्यम प्रकल्प चतुर्थ सुप्रमा मंजूरीसाठी व मंजुरी नंतर सदर कामाचे डिझाईन तयार करण्यासाठी इस्टिमेट तयार करण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सर्वच टप्प्यावर आंदोलन करावे लागले आहे ही बाब अत्यंत असंवेदनशील आहे. वास्तविक पाहता लोकशाही व्यवस्थेत जनहिताच्या उद्देश पूर्ण करणे हे सरकारचे अधिकारी वर्गाचे कर्तव्य आहे. परंतु ह्या प्रकल्पाबाबत जनहिताच्या कामांची पूर्तता करण्यासाठी अधिकारी वर्ग सत्ताधारी नेते असंवेदनशील असल्याचा वारंवार अनुभव आला आहे. मग ग्रामिण भागात सामान्य लोक हक्काच्या पाण्यासाठी सलग दोनवेळा आठ-आठ दिवस आमरण उपोषणाला बसतात . ही वेळ का आली ?तर संविधानिक पदावरील अधिकारी कामात चालढकल करत जनहिताचे निर्णय घेण्यात रूची दाखवत नाही, येथील शेतकरी अहिंसेच्या आणी संविधानीक

> **पेण वाशी खारेपाट भागात पाणी टंचाई पाचवीला पुजली आहे. कित्येक वर्षे येथील नागरिकांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. हेटवणे धरणातील पाणी प्रशासन व लोकप्रतिनिधींच्या उदासीनतेमुळे आमच्या खारेपाटात पोहचत नाही यामुळेआमच्या महीलांनी व नागरिकांनीआपणच धरणवर जावुन पाणी भरुन आणू या आसा निर्णय घेतला आहे. - प्रकाश माळी, अध्यक्ष खारेपाट विकास संघटना**

मार्गाने आपल्या हक्कासाठी सातत्याने संघर्ष करत राहिले परंतु इतक्या शेवटच्या टप्प्यात असून १५ ऑक्टोबर २०२४ रोजी निविदा उघडण्यात येऊनही अजून कार्यारंभ आदेश न दिल्याने काम सुरू झाले नाही ही वस्तुस्थिती आहे. शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ११ मार्च रोजी सकाळी ९.३० पासून हेटवणे धरणातून महीला व शेतकरी हंडा घेऊन पाणी आणण्यासाठी जाणार आहेत. यामुळे तीन दिवसाआड येणारा पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी हा मार्ग अवलंबला आहे. पुन्हा एकदा हा अधिवेशन काळात हा गंभीर प्रश्न सोडविण्यासाठी खारेपाट विकास संकल्प संघटनेच्या माध्यमातून हे आंदोलन नाईलाजाने करावे लागत आहे आसे निवेदन पेण तहसीलदार यांना दिला आहे.

### वासिंद-अंबाडी रस्ता भूसंपादन

# शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा

### भगवान भोईरांची मागणी

• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : वासिंद-अंबाडी या रस्त्याच्या सुरू झालेल्या कामात रस्त्याच्या कामात लगतच्या संपादित होणाऱ्या शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा अशी मागणी शिवसेना (शिंदे गट) उपतालुकाप्रमुख भगवान भोईर यांनी केली आहे.




वासिंद-अंबाडी या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. परंतु रस्ता रुंदीकरण होताना बाधित शेतकऱ्यांना अद्यापही सुचित करण्यात आलेले नाही. या रस्त्याच्या लगत असलेल्या मोहंडूळ, कासणे, वडवली, खानिवली, सारमाळ आदी रस्त्या लगतच्या गावातील या रस्त्याच्या कामासाठी संपादित होणाऱ्या शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन त्यांना योग्य मोबदला मिळावा असे भगवान भोईर यांनी म्हटले आहे.

समृध्दी व मुंबई -बडोदा महामार्गामध्ये संपादित झालेल्या शेतकऱ्यांना मिळालेल्या मोबदला प्रमाणे येथील शेतकऱ्यांनाही मोबदला मिळावा अशी मागणी भगवान भोईर यांनी केली आहे.

# कणक वीरा नदीच्या पुलाचे संरक्षण कठडे दुरुस्त करा

• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : टोकावडे ते तळेगाव या बारा किलोमीटर इतर जिल्हा मार्गात समावेश होणाऱ्या ११२ टोकावडे करचोंडे मार्गे तळेगाव हा १२ किलोमीटरचा रस्ता हा १९९८ सालात डांबरीकरण झाला या रस्त्यावरील कणक् वीरा नदीवरील करचोंडे गावाजवळील पूल २०१५ रोजी वाहतुकीसाठी खुला झाला त्या दिवसापासून या पुलाच्या संरक्षण कठड्याच्या कामाकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे १९९८ सालामध्ये डांबरीकरण झालेल्या या रस्त्यावरील महत्त्वाचा दुवा असणारा हा पूल २०१५ रोजी बांधण्यात आला परंतु त्यानंतर थातूरमातूर रंगरंगोटी करून हा फुल वाहतुकीसाठी खुला झाल्यानंतर तेव्हापासून आतापर्यंत या फुलाच्या संरक्षण कठीण अथवा रंगोटीकडे सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष झालेले आहे सद्यस्थितीला पुलाचे संरक्षण कठडे तुटले असून ते तात्काळ पुन्हा बांधण्यात यावे अशी मागणी ग्रामस्थ व वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.





# उल्हासनगरात परिवहन सेवेच्या ११५ प्रवासी बस निवाऱ्यांचे काम फास्ट-ट्रॅकवर

• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : गेल्या 10 वर्षांपासून ठप्प पडलेल्या उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन सेवेच्या बसेस आता शहरात धावू लागल्या आहेत.त्यासाठी 115 बस निवारे उभारण्याचे काम फास्ट-ट्रॅकवर आणण्याचे आणि कुणीही निवाऱ्यांना विरोध केल्यास एफआयआर दाखल करण्याचे आदेश आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी कंत्राटदारास दिले आहेत.परिवहन विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी स्थायी समिती सभागृहात अधिकारी व कंत्राटदार यांच्या सोबत बैठकीचे आयोजन केले होते.यावेळी परिवहनचे सहायक आयुक्त तथा जनसंपर्क अधिकारी अजय साबळे,विभागप्रमुख





> **विरोध करणाऱ्यांवर एफआयआर दाखल होणार**
> **- आयुक्त मनीषा आव्हाळे यांचे आदेश**

विनोद केणे आदी उपस्थित होते. या बैठकीत नियमाप्रमाणे बस निवारे निश्चित केलेल्या जागेवरच उभारणे,कुणाचा हस्तक्षेप खपवुन घेऊ नये,प्रवाशी निवारे उभारले असतील तर ते पुन्हा दुसऱ्या जागी हलवू नये,बस निवाऱ्यावर अनधिकृत होर्डिंग असतील तर ते त्वरित काढण्यात यावी,होर्डिंग किंवा बस निवारे उभारताना विरोध करणाऱ्या व्यक्ती विरुद्ध पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात यावी,शहरात रस्ता दुरुस्तीचे काम सुरू असल्याने वातानुकूलित बसेस शहाड रेल्वे स्टेशन पूर्व ते टिटवाळा रेल्वे स्टेशन पूर्व दरम्यान चालवण्यात यावी,बस गाडयांमध्ये नियमितपणे तिकीट तपासणी करण्यात यावी,बस निवाऱ्या वरती जाहिराती बरोबर उल्हासनगर महापालिकेच्या विविध योजनांच्या प्रसिद्धी देऊन जनजागृती करावी,दिव्यांग, महिला व वृद्ध यांच्या करीता तिकीट पास मध्ये सवलती देण्याबाबत तात्काळ विभागामार्फत प्रस्ताव प्रस्तावित करण्यात यावा. असे आदेश व सुचना आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी संबंधित अधिकारी,कर्मचारी तसेच कंत्राटदार यांना दिले आहेत.

**""परिवहन सेवेचा प्रवास""**

2009 साली उल्हासनगर परिवहन सेवेची सुरवात करण्यात आली होती. त्याचा कंत्राट केष्ट्रल इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीचे राजा गेमनानी याना देण्यात आला होता. गोरगरिबांची ही सेवा 2014 पर्यंत धावली होती.मात्र डिझेल,पेट्रोलचे दर सातत्याने वाढत असताना वारंवार मागणी करूनही प्रवासी भाडेवाढ करून मिळत नसल्याने राजा गेमनानी यांनी परिवहन सेवेचा गाशा गुंडाळला होता. तेंव्हापासून बससेवा बंद पडली होती. मात्र तत्कालीन आयुक्त अजीज शेख,तत्कालीन मुख्यालय उपायुक्त अशोक नाईकवाडे यांनी परिवहन विभागप्रमुख विनोद केणे यांना निविदा प्रक्रिया हाताळण्याचे आदेश दिले.त्याला प्रतिसाद मिळाला आणि पुण्याच्या कंपनीला कंत्राट मिळाला. अजीज शेख,अशोक नाईकवाडे यांनी पुण्यात जाऊन बसची पाहणी केल्यावर शहरात 10 बसेच आणि कल्याण ते बदलापूर या मार्गावर 5 वातानुकूलित बसेस धावू लागल्या आहेत. उल्हासनगर,अंबरनाथ ते बदलापूर पर्यंत 115 प्रवासी बस निवारे उभारण्याच्या कामांना गती देण्यात येणार असून त्यापैकी 16 निवारे उभारण्यात आल्याची माहिती सहायक आयुक्त अजय साबळे,विभाग विनोद केणे यांनी दिली

### शिवसेना शिष्टमंडळ

# पालघर जिल्ह्यात एस.टी. डेपो परिसराची पाहणी करणार



• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : शिवसेना मुख्यनेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार राज्यातील सर्व डेपो आगार परिसराची पाहणी दौरा शिवसेना महिला आघाडी करत आहे. या अनुशंगाने शिवसेना पालघर लोकसभा संपर्कप्रमुख भारती गावकर, जिल्हा सचिव अतुल पाटील आणि विधानसभा संघटक प्रथमेश बांदेकर यांच्या उपस्थितीत, पालघर जिल्ह्यातील वसई बस आगारातील आगार व्यवस्थापक स्वप्नील आहेर यांची भेट घेऊन महिला सुरक्षतेबाबत आगार परिसरात पाहणी केली.

त्यावेळी त्यांच्या बरोबर वसई तालुका संघटक अश्विनी चव्हाण, वसई तालुका उपप्रमुख राहुल कांबळे, माजी उपजिल्हासंघटक, मनाली चौधरी, वसई तालुका उप संघटक , अर्पिता पडवळ, वसई शहर संघटक पद्मा जाधव, मंगला मुंढे, चेतना जाधव, उपशहरप्रमुख चंद्रकांत कोलते, विद्या गौळ पदाधिकारी आणि शिवसैनिक उपस्थित होते.



**पालघर जिल्हाधिकारी मा. श्री. गोविंद बोडकेंना भेटून वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. ह्या वेळी पत्रकार ऋषीकेश जाधव, मंगेश उईके, किरण पाटील,संजय राऊत ह्यावेळी उपस्थित होते.**




# कृषी पणन मंडळाच्या मिलेट महोत्सवात २५ लाखांची विक्री

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ कोल्हापूर विभागाने दिनांक 1 मार्च ते 5 मार्च 2025 रोजी मिलेट व फळ महोत्सवाचे वी टी पाटील सभागृहामध्ये आयोजन केले होतेसदर मिलेट महोत्सवामध्ये राज्यातील नऊ जिल्ह्यांमधून मिलेट उत्पादक व फळ उत्पादक शेतकरी आलेले होते. महोत्सवातील एकूण 45 स्टॉलमध्ये विविध प्रकारच्या मिलेट उत्पादनांची व फळांची विक्री करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने ज्वारी 100 क्विंटल, नाचणी 20 क्विंटल, मिलेट्स 60 क्विंटल, तसेच 580 किलो स्ट्रॉबेरी, 600 किलो अंजीर, 70 किलो गुजबेरी 35 किलो मध आणि 10 क्विंटल द्राक्ष, एक्सपोर्ट क्वालिटीचे डाळिंब 400 किलो विक्री झालेली आहे.



शेवटच्या दिवशी महोत्सवामध्ये महिलांसाठी मिलेटच्या पाककृतींची स्पर्धा घेण्यात आलेली होती. या स्पर्धेसाठी एकूण 30 महिलांनी सहभाग घेतलेला होता. सदर पाककृतींची पर्यवेक्षण करण्यासाठी प्रामुख्याने महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या मिलेट संशोधन केंद्राचे डॉक्टर योगेश बन, एस जी एम महाविद्यालय कराड येथील फूड सायन्स विभागाच्या प्राध्यापक डॉक्टर अहिल्या वाघमोडे, वखार महामंडळ कोल्हापूरच्या सौ तृप्ती कोळेकर तसेच सावंत ऑरगॅनिकच्या जिजामाता कृषी भूषण पुरस्कार प्राप्त सौ पूजा सावंत यांनी पर्यवेक्षण केले.

सदर पाककृती स्पर्धेमध्ये सर्वच सहभागीदार महिलांनी अतिशय उत्कृष्ट अशा पाककृती ठेवलेल्या होत्या. त्यामध्ये सौ विद्या शिंदे यांनी मिलेटची पौष्टिक थाळी ठेवलेली होती. त्यास स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त झाला तसेच सौ मयुरी रानमाळे यांनी वरी भगर पासून क्रिस्पी बॉल्स तयार केलेले होते त्यास द्वितीय क्रमांक प्राप्त झालेला आहे तसेच संजीवनी प्रभावळे या ज्येष्ठ महिलांनी भगरीची खीर ठेवलेली होती त्यास तृतीय क्रमांक प्राप्त झालेला आहे. त्याचप्रमाणे कुमारी शिवानी बिक्कड यांनी नाचणीचे सूप शेवग्याच्या रसासह ठेवलेले होते त्यास उत्तेजनार्थ बक्षीस प्राप्त झालेले आहे मागील वर्षी कोल्हापूरमध्ये मिळालेला प्रतिसाद विचारात घेता यावर्षी करवीरवासीयांनी मिलेट व फळ महोत्सवास प्रचंड प्रतिसाद दिलेला असून महोत्सवामध्ये रक्कम रुपये 25 लाख उलाढाल झालेली आहे.

पाककृती स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्र , सन्मान चिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आलं. सदर कार्यक्रमासाठी माननीय श्री महेश कदम विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था कोल्हापूर विभाग हे उपस्थित होते. श्री महेश कदम यांच्या शुभहस्ते मान्यवर विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी श्री महेश कदम यांनी विजेत्या महिलांचे अभिनंदन केले व तयार केलेल्या मिलेटच्या विविध पदार्थांचे कौतुक केले. सदर कार्यक्रमास डॉक्टर अहिल्या वाघमोडे, श्रीमती सूर्यप्रभा भोसले, सौ तृप्ती कोळेकर, सौ पूजा सावंत, श्री पी डी सावंत, कृषी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉक्टर सुभाष घुले, श्री प्रतीक गोनुगडे, श्री ओंकार माने, श्री प्रसाद भुजबळ, अमृता जाधव, सुयोग टकले, संदेश पिसे, किरण जाधव, श्री अनिल जाधव व श्री बबनराव रानगे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# मध्य रेल्वेवर दोन दिवसीय मेगा ब्लॉक

## आसनगाव कसाऱ्यातील प्रवाशांचे होणार हाल


दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मध्य रेल्वेवरील कसारा स्थानकावर उड्डाणपुलाची तुळई उभारण्यासाठी विशेष वाहतूक ब्लॉक घेण्यात येणार आहे. हा ब्लॉक शनिवारी, रविवारी तीन टप्प्यांत घेण्यात येणार आहे. शनिवारी सकाळपासून या ब्लॉकला सुरुवात होईल. या ब्लॉकमुळे मध्य रेल्वेच्या वेळापत्रकावर परिणाम होणार आहे. तसेच कसारा येथे येणाऱ्या लोकल अंशतः रद्द करण्यात येणार असून कसारा – आसनगाव दरम्यानचालोकल प्रवास करणे कठीण होणार आहे.

मध्य रेल्वेवरील पहिला ब्लॉक शनिवारी सकाळी ११.४० ते दुपारी १२.१० पर्यंत कसारा स्थानकाच्या अप आणि डाऊन मार्गावर असेल. तर, दुसरा आणि तिसरा ब्लॉक रविवारी सकाळी ११.४० ते दुपारी १२.१० आणि दुपारी ४ ते दुपारी ४.२५ या वेळेत कसारा स्थानकाच्या अप आणि डाऊन मार्गावर घेण्यात येणार आहे. ब्लॉक कालावधीत शनिवारी आणि रविवारी सकाळी ९.३४ वाजता सीएसएमटी येथून सुटणारी कसारा लोकल आसनगावपर्यंत चालवण्यात येईल. तर, आसनगाव – कसारा दरम्यान ही लोकल सेवा रद्द करण्यात येणार आहे.

रविवारी दुपारी १.१० वाजता सीएसएमटी येथून सुटणारी कसारा लोकल कल्याणपर्यंत चालवण्यात येईल. तर, कल्याण – कसारादरम्यान ही लोकल रद्द करण्यात येणार आहे. शनिवारी आणि रविवारी सकाळी ११.१० वाजता कसारा येथून सुटणारी सीएसएमटी लोकल आसनगाव येथून सुटेल. त्यामुळे कसारा – आसनगावदरम्यान ही लोकल उपलब्ध नसेल. शनिवारी आणि रविवारी दुपारी ४.१६ वाजता कसारा येथून सुटणारी सीएसएमटी लोकल कल्याण येथून सुटेल. त्यामुळे कसारा – कल्याण दरम्यान लोकल सेवा उपलब्ध नसेल, अशी माहिती मध्य रेल्वे प्रशासनाने दिली.

# वाकडपाडा येथे शिवसेना चषक नाइट आर्म क्रिकेट उत्साहात




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** वाकडपाडा येथे शिवसेना चषक नाइट आर्म क्रिकेट स्पर्धा उत्साहात.जितेंद्र मोरघा मोखाडा तालुक्यातील क्रिकेट रसिकां साठी वाकडपाडा येथे भव्य नाइट आर्म क्रिकेट स्पर्धेचे आयोजन युवासेनेच्या वतीने करण्यात आले होते.

वाढत्या उन्हामुळे दिवसा मैदानी खेळ खेळायला हैराणी होते, त्यामुळे रात्री सुरू असलेल्या या स्पर्धेला प्रचंड प्रतिसाद मिळाला.मोखाडा तालुक्या बरोबर शहापूर, इगतपुरी व त्र्यंबकेश्वर तालुक्यातील संघांनी देखील या स्पर्धेत सहभाग घेतला.स्पर्धेचे उद्घाटन व बक्षिस समारंभ शिवसेना विधानसभा संघटक प्रदीप वाघ यांच्या हस्ते पार पडला,.

यावेळी विभाग प्रमुख निलेश झुगरे, सरपंच लता वारे, नरेंद्र येले,माजी सरपंच संजय वाघ, मंगेश दाते, पोलिस पाटील विठ्ठल गोडे, गणेश खादे,डॉ राजेश वाघ, उपसरपंच नंदकुमार वाघ,मोहन मोडक, अनंता वारे, पत्रकार गणेश वाघ निलेश ठोमरे, मुंबई पोलीस युवराज वाघ, गोविंद वाघ, योगेश खोरगडे सर, डॉ शिवाजी घोरपडे सखाराम शिद, माजी सरपंच मोहन गवारी प्रितम लहामगे, नितीन पिठोले इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते, स्पर्धेत प्रथम क्रमांक उधळे, द्वितीय क्रमांक हट्टी पाडा, तृतिय क्रमांक गोमघर, चतुर्थ क्रमांक मोखाडा संघाने पटकावला.

या स्पर्धेच्या आयोजनासाठी वाकडपाडा गावचे शाखा प्रमुख अशोक वाघ, युवा सेनेचे संदीप वाघ, मयुर वाघ,यतिक खादे, भास्कर गांगड क्रिकेट मंडळाचे भोलेश्वर शेजवळ, पुंडलिक शिंदे, निखिल खाडे,राज वाघ इत्यादी खेळाडुंनी उत्कृष्ट नियोजन करून स्पर्धा यशस्वी रित्या पार पाडली.



# ठणठणीत रस्त्यांच्या दुरुस्तीचा घाट

## ठाणे मनपाच्या कारभारावर आश्चर्य

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** दोन वर्षांपूर्वी सुमारे ६०० कोटी रुपये खर्च करून ठाण्यात मजबूत रस्त्यांचे जाळे उभारण्यात आले आहे. असे असतानाही ठाणे पालिका प्रशासनाने सुस्थितीत असलेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीचा घाट घातला आहे. यासंदर्भात निविदा प्रसिद्ध केल्यानंतर हा घोटाळा उघडकीस आला आहे.

विशेष म्हणजे पालिकेच्या तिजोरीत खडखडाट आहे. रस्ते दुरुस्तीची ठेकेदारांची मागील बिले थकलेली असतानाही प्रशासनाकडून ही लूट कशासाठी होत आहे, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

ठाणे महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने चरई, धोबी आळी, डॉ आंबेडकर, उथळसर, जोगीला मार्केट, मनोरपाडा, सामंत वाडी, लॉरीं स्टॅन्ड आणि भोईर चाळ या भागातील रस्त्याचे यू. टी. डब्लू. टी पद्धतीने काँक्रीटीकरण करण्याची निविदा दोन दिवसांपूर्वी प्रसिद्ध केली आहे. महापालिका क्षेत्रात मूलभूत सुविधांच्या विकासांतर्गत नगर अभियंत्यांच्या मंजुरीने ही निविदा प्रसिद्ध केली आहे. ठेकेदारांना अर्ज करण्यासाठी १२ मार्चपर्यंत मुदत दिली आहे. यासर्व कामांसाठी सुमारे पाच कोटींचा खर्च अपेक्षित आहे.

ठाणे पालिकेने दुरुस्तीसाठी काढलेले रस्ते सुस्थितीत असून, आधी केलेल्या कामाची बिले ठेकेदाराला देण्यात आली आहेत. असे असतानाही हा उद्योग कोणत्या अर्थकारणासाठी झाला, असा सवाल शिवसेना शिंदे गटाचे माजी नगरसेवक सुधीर कोकाटे यांनी उपस्थित केला आहे. तसेच यासंदर्भाची तक्रार उपमुख्यमंत्री तथा ठाण्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

# वसई विरार महापालिकेची ५५ पैकी ३४ आरोग्य मंदिरे पूर्ण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वसई- वसई विरार महापालिकेने ३४ आयुष्यमान आरोग्य मंदीर बांधून पुर्ण केली आहे. नुकतेच वसईच्या गिरीज आणि विरारच्या कसराळी येथे दोन आयुष्यमान आरोग्य मंदीराचे उद्घाटन करण्यात आले.





राज्य शासनाने वसई विरार महापालिकेला ५५ आयुष्यमान आरोग्य मंदिर बांधण्याचे उद्दिष्ट दिले होते. त्यापैकी पालिकेने ३४ केंद्र तयार केली आहे. वसईच्या गिरीज येथेली टोकपाडा येथील आयुष्यमान आरोग्य मंदीराचे उद्घाटन आमदार स्नेहा दुबे पंडीत यांच्या हस्ते तर विरारच्या कसराळी येथील आयुष्यमान आरोग्य मंदीरांचे उद्घाटन आमदार राजन नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. या लोकार्पण कार्यक्रमावेळी मान्यवर नागरिक,उपायुक्त समीर भुमकर,महानगरपालिका अधिकारी, वैद्यकीय आरोग्य विभागाचे कर्मचारी,सर्वपक्षीय पदाधिकारी उपस्थित होते. वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील विविध २ ठिकाणी महानगरपालकेमार्फत आयुष्यमान आरोग्य मंदीर नागरिकांच्या आरोग्य सेवेसाठी सुरु करण्यात आले आहेत. यासोबत आतापर्यंत एकूण ३४ आयुष्यमान आरोग्य मंदीर कार्यान्वित झाले आहेत. उर्वरित २१ आरोग्य मंदिरे लवकरच पूर्ण केली जातील, असे पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी सांगितले.

या आरोग्य केंद्रातून बाह्य रुग्ण विभाग सेवा, दीर्घकालीन संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोगाची तपासणी व प्रतिबंध उपाययोजना, एच.बी. (हिमोग्लोबिन), मलेरिया चाचणी (बि.एस. एम.पी.)युरिन प्रेगनन्सी रॅपिड टेस्ट, मधुमेह तपासणी, डेंग्यू चाचणी, लसीकरण अशा सुविधा नागरिकांना दिल्या जातील अशी माहिती पालिकेकडून देण्यात आली आहे. या आरोग्य केंद्रामुळे आजूबाजूच्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांना मोफत व सवलतीच्या दरात उपचार मिळण्यास मदत होणार आहे.

# कर्जतच्या दुय्यम निबंधक कार्यालयास भीषण आग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कर्जत :** रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील शहरातील टेकडीवर पडक्या वास्तूत सुरू असलेल्या दुय्यम निबंधक कार्यालय परिसरात आज (6 मार्च) सायंकाळी भीषण आग लागून एकच तारांबळ उडालेली पाहायला मिळाली. टेकडीवरील या परिसरात जंगल भाग असल्याने आग आटोक्यात येण्यास खुप कष्ट घ्यावे लागले. कर्जत नगरपरिषदेची अग्निशामक दलाची गाडी वेळेत पोहचल्याने मोठी दुर्घटना टळली असली तरीही प्रशासनाने याप्रकरणी तत्काळ कारवाई करणे गरजेचे आहे, अशी नागरिकांची मागणी आहे. यापूर्वीच, पडक्या वास्तूत सुरू असलेल्या कार्यालयाविषयी अनेक वर्तमानपत्रातून बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. मात्र, प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई केली नाही. परिणामी, आज लागलेल्या आगीमुळे मोठे नुकसान झाले नसले तरी प्रशासनाने खबरदारी घेणे गरजेचे, या आगीमुळे आसपासच्या रहिवाशांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला होता. नागरिकांच्या मते, अशा प्रकारच्या पडक्या वास्तूतील कारभार नव्या प्रशासकीय



भवन इमारतीत हलविला असता तर वेळेत कार्यवाही झाली असती, तर ही दुर्घटना टाळता आली असती. आता तरी प्रशासनाने जागे होऊन योग्य ती खबरदारी घ्यावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, प्रशासकीय भवनामध्ये अधिकृत दुय्यम निबंधक कार्यालय सुरू करावे अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे, जेणेकरून अशा अनधिकृत कार्यालयांना आळा बसू शकेल आणि नागरिकांची फसवणूक व धोका टळेल. कर्जत शहरात अलीकडेच उभारण्यात आलेल्या सुसज्ज प्रशासकीय भवनात तहसील कार्यालय, प्रांत कार्यालय आणि इतर शासकीय कार्यालयांचे स्थलांतर यशस्वीपणे झाले. त्यामुळे नागरिकांना अत्यंत सोयीसाठी या ठिकाणी सर्व सेवा एकत्रितपणे मिळत आहेत. मात्र दुय्यम निबंधक कार्यालय अजूनही जुन्या, धोकादायक वास्तूतच कार्यरत असल्याने नाराजी व्यक्त होत आहे. सन १९०७ मध्ये उभारलेल्या ब्रिटिशकालीन इमारतीत सध्या दुय्यम निबंधक कार्यालय चालवले जात आहे.

या वास्तूची जीर्ण अवस्था पाहता तेथे मोठ्या दुर्घटनेची शक्यता आहे. शिवाय, या ठिकाणी अनेक महत्त्वाची कागदपत्रे साठवलेली आहेत. पावसाळ्यात पाण्याचा प्रवेश किंवा आगीसारखी संभाव्य दुर्घटना घडल्यास महत्त्वाचे जुने दस्तऐवज नष्ट होऊ शकतात, अशी भीती नागरिकांमध्ये आहे. तसेच याच इमारतीत तहसीलदार यांचे अखत्यारीतील ट्रेझरी रूम आणि पोलीस कस्टडी (लॉकअप) याच ठिकाणी आहे. यांची सुद्धा अवस्था अत्यंत जीर्ण असून कोणतीही दुर्घटना या ठिकाणी घडू शकते. हे विभाग सुद्धा प्रशासनाने स्थलांतरित करावेत अशी मागणी होत आहे.

# ठाणे - मुंबईकरांची उकाड्याने काहिली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून पहाटे गारवा जाणवत असला तरी मुंबईकरांना दुपारी उन्हाचा तडाखा सोसावा लागत आहे. मुंबईकर शुक्रवारीही घामाच्या धारांनी हैराण झाले होते. सतत उन्हामध्ये काम केल्याने शरीरातील तापमान नियंत्रित करण्याच्या यंत्रणेत बिघाड होतो. परिणामी, शरीरातील पाण्याची पातळी कमी होते आणि उष्माघाताचा त्रास होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे मुंबईकरांनी दुपारी घराबाहेर पडताना काळजी घ्यावी, असे आवाहन हवामान विभागाने केले आहे. मुंबईकर सध्या दुपारच्या उन्हामुळे हैराण झाले आहेत. वाढता उकाडा नागरिकांसाठी त्रासदायक ठरत आहे. मागील काही दिवसांपासून मुंबईच्या वातावरणात सातत्याने बदल होत आहे. यामुळे काही दिवसांपासून मुंबईत उन्हाचा ताप वाढला आहे. कडकडीत ऊन, असह्य उकाडा आणि घामाच्या धारांनी मुंबईकर हैराण झाले आहेत. उन्हाच्या झळांनी नागरिकांची लाही होत आहे. शुक्रवारी सकाळपासून उकाडा जाणवत होता. सकाळी दहानंतरच उन्हाची तीव्रता वाढली आणि झळा जाणवू लागल्या. दुपारी घरात आणि बाहेर फिरतानाही उन्हाचा दाह जाणवत होता. दरम्यान, फेब्रवारीच्या मध्यापासून मुंबईतील तापमानाचा पारा ३५ अंशापार पोहोचला आहे. यामुळे येता उन्हाळा आणखी तापदायक असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# शहाड मध्ये पाणी समस्या गंभीर

## पाणी समस्या सोडविण्यासाठी महिलांचे प्रशासनाला साकडे

**शहाडमध्ये पहाटे साडेतीन वाजता पाणी येते आणि पहाटे 5 वाजता जाते. पुन्हा सकाळी 9 ते 10 या वेळेत पाणी असते, पण प्रेशर कमी असतो. तसेच लाईट गेली तर सोसायटीमध्ये पाणीपुरवठा व्यवस्थित होत नाही. रात्री पाणी येत असून ते देखील कमी दाबाने असल्याने हे पाणी भरण्यासाठी महिलांना मोठी कसरत करावी लागते.**



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. 15 शहाड मध्ये पाण्याची मोठी समस्या असून या पाणी समस्येने गंभीर रूप धारण केले आहे. ही पाणी समस्या सोडविण्यासाठी येथील महिलांनी केडीएमसी प्रशासनाला साकडे घातले असून याबाबत त्यांना पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता भदाणे यांची भेट घेऊन निवेदन दिले आहे.

सध्या मार्च महिना सुरू असून उन्हाळ्याची सुरवात आहे. उन्हाळ्याच्या या सुरवातीलाच शहाड येथील नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. शहाडमध्ये पहाटे साडेतीन वाजता पाणी येते आणि पहाटे 5 वाजता जाते. पुन्हा सकाळी 9 ते 10 या वेळेत पाणी असते, पण प्रेशर कमी असतो. तसेच लाईट गेली तर सोसायटीमध्ये पाणीपुरवठा व्यवस्थित होत नाही. रात्री पाणी येत असून ते देखील कमी दाबाने असल्याने हे पाणी भरण्यासाठी महिलांना मोठी कसरत करावी लागते. रात्रभर पाणी भरण्यासाठी जागल्या नंतर सकाळी पुन्हा दैनंदिन कामे करावी लागतात. यामुळे महिलांच्या तब्येतीवर देखील परिणाम होत आहे.

पाणी टंचाईमुळे नागरिकांना विशेषतः महिलांना होणारा त्रास लक्षात घेता, पहाटे 5 ते सकाळी 9 आणि रात्री 9 ते 11 वाजेपर्यंत पाणी पुरवठा सुरू ठेवण्याची मागणी भारतीय जनता पार्टी मोहना टिटवाळा मंडळ उपाध्यक्ष मोहन कोनकर यांनी निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी शहाड येथील सुवर्णा कोनकर, वर्षा कोनकर, रेश्मा ढोणे,राखी काळे, हेमा कोनकर, चांगुणा कोनकर, लडकु कोनकर, अर्चना काळे, नीलम कोनकर, मीराबाई कोट आदींसह गावातील महिला उपस्थित होत्या.

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**

दुरध्वनी क्र. ०२५१-२२०३६२१

**उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग**

**-: नोटीस :-**

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील खालील नमूद अर्जदाराने विकास कामात बाधित होणारी झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस परवानगी मागीतली आहे.

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव | झाडे तोडावयाचे ठिकाण | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे, मुंबई-५१. | कल्याण-मुरबाड रोड (पाम वॉटर रिसॉर्ट) ते बदलापूर रोड (जगदीश दुग्धालय) ते पुना लिंक रोड पर्यंत, कर्जत-कसारा रेल्वे मार्गावरील वालधुनी नदी क्रॉसिंगला | २७९ | स्लिप रोडसह उन्नत रस्त्याचे कामात बाधित होत असल्याने. |

सदरची झाडे तोडण्यास/पुनर्रोपणास परवानगी देणे अगोदर कोणाच्या काही हरकती असल्यास त्या महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३) अन्वये मागविण्यात येत आहेत. तरी कोणाच्या हरकती असल्यास ७ दिवसाच्या आत उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागात लेखी स्वरुपात योग्य त्या कागदपत्रांसह देण्यात याव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

*जावक क्रमांक :-
कडोंमपा/जसवि/मुका/२५७
दि. ०७/०३/२०२५

सही/-
(संजय जाधव)
वृक्ष अधिकारी, वृक्ष प्राधिकरण विभाग,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

# पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांचा सन्मान



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

ठाणे : ठाणे शहरातील तरुण वर्ग नशेच्या आहारी जाऊ नये म्हणून पोलीस आयुक्त आशुतोषजी डुंबरे यांचे आदेशानुसार प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच तरुणाचे भविष्य हे नशाविरहित होऊन सुदृढ राखण्यास मोलाचे सहकार्य होत आहे. या कार्याची दखल घेऊन पोलीस आयुक्त आशुतोषजी डुंबरे यांचे प्रेरणादायी कर्तव्यदक्षतेला स्मरून आंतरराष्ट्रीय मानवधिकार वेल्फेअर असोसिएशनद्वारे सन्मानचिन्ह देत गौरविण्यात आले. यावेळी आंतरराष्ट्रीय मानवधिकार वेल्फेअर असोसिएशन संचालक समिर परब, सामाजिक न्याय विभाग सचिव, आंतरराष्ट्रीय मानवधिकार वेल्फेअर असोसिएशन,शिवसेना उपविभागप्रमुख गणेश संपत तांबे, आंतरराष्ट्रीय मानवधिकार वेल्फेअर असोसिएशन सदस्या रुपाली जाधव हे उपस्थित होते.

## संक्षिप्त

### तांदळाच्या भाकरीवर रेखाटले महिला दिनाचे चित्र




• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : 8 मार्च जागतिक महिला दिन निमित्ताने छत्रपती शिक्षण मंडळाचे नूतन विद्यालय कर्णिक रोड येथील कलाशिक्षक श्रीहरी पवळे यांनी तांदळाच्या भाकरीवर महिला दिनाचे चित्र रेखाटून समस्त महिला वर्गांना शुभेच्छा दिल्या.

### सोसायटी पुनर्विकासाबद्दल रविवारी मोफत मार्गदर्शन

• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सोसायटीचे पुनर्विकास करण्याबद्दल महाराष्ट्र सोसायटीज वेलफेअर असोसिएशनचे समनव्यक विजय सावदेकर यांच्या वतीने रविवारी दिनांक ९ मार्च रोजी स. ९:३० ते दु. १:३० वा.पर्यंत, कल्याण पश्चिमेतील के. सी. गांधी स्कूल ऑडिटोरियम येथे महासेवा (महाराष्ट्र सोसायटीज वेलफेअर असोसिएशन) तर्फे मोफत "पुनर्विकास सेमिनार" आयोजित करण्यात आले आहे.

या सेमिनारमध्ये पीएमसी, वकील, सीए, टॅक्स एक्सपर्ट आणि डेव्हलपर यांच्या उपस्थितीत या महत्त्वपूर्ण विषयावर सादरीकरण व तज्ञांकडून प्रश्नांची उत्तरे देण्यात येतील. ज्यामुळे पुनर्विकास प्रक्रियेतील संपूर्ण माहिती मिळेल. संपर्क ९०८२९०९५७६

### अंगणवाडी सेविका, मुख्य सेविकांना प्रोत्साहन भत्ता मंजूर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : महाराष्ट्र राज्यात महिला व बाल विकास विभागाच्या अंतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना दि. 01 जुलै 2024 पासून लागू करण्यात आली आहे. योजनेअंतर्गत पात्र महिलांचे अर्ज नारी शक्ती दूत ॲप आणि लाडकी बहीण वेब पोर्टल वरून भरण्याची जबाबदारी अंगणवाडी सेविका आणि मुख्य सेविकांना देण्यात आली होती. यानुसार रायगड जिल्ह्यासाठी रु.1 कोटी 14 लाख 83 हजार 900 इतके अनुदान मंजूर झाले असल्याची माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, रायगड-अलिबाग सुहिता ओव्हाळ यांनी दिली आहे.

आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्या आदेशानुसार रायगड जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका आणि मुख्य सेविकांना एकूण रु.1,14,83,900 (अक्षरी एक कोटी चौदा लाख त्र्याऐंशी हजार नऊशे) रुपयांचे प्रोत्साहन भत्त्याचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

अंगणवाडी सेविका यांनी नारी शक्ती दूत ॲप आणि लाडकी बहीण वेब पोर्टल वर यशस्वीपणे नोंदवलेल्या 2 लाख 29 हाजर 184 अर्जांवर आधारित रु.50 प्रति अर्ज प्रमाणे रु.1,14,59,200/- अनुदान मंजूर. मुख्य सेविकांनी नोंदवलेल्या 494 अर्जांवर आधारित रु.50 प्रति अर्ज प्रमाणे रु.24,700 अनुदान मंजूर. हे अनुदान तालुकानिहाय बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण/नागरी) यांच्या डीडीओ खात्यावर वर्ग करण्यात आले असून, जागतिक महिला दिनानिमित्त अंगणवाडी सेविका आणि मुख्य सेविकांच्या खात्यावर हे भत्ते वर्ग करण्याची कार्यवाही सुरू आहे.

# लेक परक्याचे धन...

भूतलावर प्रत्येकाच्या आयुष्यातील अनेक सुखद सोहळ्यातील एक सोहळा म्हणजे "शुभ-विवाह" होय.अगदी नऊ महिने वाढलेला गोळा जेव्हा या दुनियेत येत असतो,मग तो मुलगा असो वा मुलगी संघर्ष हा कोणालाच चुकलेला नाही.मुलगा आणि मुलगी म्हटल्यावर सतत संघर्ष,सतत प्रयत्न, स्वप्नांच्या मागे धावणे,तरीही मुलगी दिवस -रात्र न थकता काम करून सर्वांना सांभाळून घेण,सर्वांच्या अपेक्षा पूर्ण करणे आणि स्वतःला विसरून जाणं,लग्नाआधी आई वडिलांच्या धाकात लग्नानंतर नवऱ्याच्या धाकात राहणं,अगदी सर्वांच्या प्रगती साठी स्वतःची झीज करणं हे चालूच असतं अगदी आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत.

आई - वडील मुलीला लहानाच मोठं करतात, नको - नको ते लाड पुरवत असतात आणि आपली मुलगी वयात आली की मगआपल्या रितीरिवाज,संस्कृतीनुसार तीच लग्न करावं लागतं,मग मुलगा बघण्यापासून ते अगदी ती सासरी गेल्यावर तीच्या सुखी- संसारापर्यंत



काळजीत असणाऱ्या एका आई-बाबाच्या मनातील हळहळ.....!

एक बाप जेव्हा आपल्या मुलीला लहानाचं मोठं करतो तेव्हा तीच्या भविष्याची स्वप्नं रंगवताना त्याच्या मनात,मनाच्या कोपऱ्यात कुठेतरी एक भिती रुजलेली असते, आपण एवढ्या लाडा-गोडाने मुलीला वाढवलं लग्नानंतर सासरी गेली की, तीला आपल्या घरच्यांसारखी वागणूक मिळेल का? तीला उत्तम साथीदार मिळेल का जो तीला समजून घेईल, आपलसं करेल,आपल्या अंगणात रुजलेल रोपट दुसऱ्याच्या अंगणात जाऊन बहरेल की कोमेजेल याची चिंता असते एका बापाला, जस आपल्या घरी तीला प्रेम मिळालं,तस प्रेम तीला तीच्या सासरी मिळेल का? याची काळजी असते एका बापाला खरचं पण बाप आपल्या मुलीची पाठवणी करतो तेव्हा आपल्या काळजाचा तुकडा दुसऱ्याच्या हाती देताना त्या बापाची काय ढालमेल होते ना, ती कोणालाच समजणारी नसते.

आईचं ते हळवं मन,डोळ्यांना सुटलेला पाझर आणि डोक्यात असंख्य विचारांच वादळ हे सार मनात ठेवून एक आई- वडिल आपल्या लेकीचा हात हातात देताना सांगत असतात,जावई बापू माझ्या लेकिने माहेरी नाही कष्ट घेतले पण सासरी ती घेईल तर ती चुकेल तेव्हा तिला सांभाळून घ्या....शेवटी आईवडीलच ना ते कारण मुलगी म्हणजे आईची सावली,एकुलती एक तिची ती बाहुली...आईसारखं व्हावे असे वाटत असते प्रत्येकीला पण आईचे मागणं एकच सर्व सुख मिळो माझ्या लेकीला...!



- कु.हेमा नंदू रांबाडे
( मुर्तवडे - चिपळूण )

# खडगोळवली चिंचपाडा येथील एस.टी.पी प्लांट आणि डंपिंग ग्राउंडला नागरिकांचा विरोध



### दोन्ही प्रकल्प बंद करण्याची माजी सभापती संध्या तरे यांची मागणी केडीएमसी आयुक्तांना दिले पत्र

•दैनिकठाणेजीवनदीपवार्ता

कल्याण : कल्याण पूर्वेतील चिंचपाडा खडेगोळवली येथील एस.टी.पी प्लांट व वसंतवाटीका समोरील मोकळया जागेवर होत असलेल्या डंपींग ग्राउंड या दोन्ही प्रकल्पांना नागरिकांनी विरोध केला असून हे नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेता हे दोन्ही प्रकल्प बंद करण्याची मागणी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या माजी महिला व बाल कल्याण समिती सभापती संध्या जगदीश तरे यांनी केडीएमसी आयुक्तांना पत्र देत केली आहे.

चिंचपाडा खडेगोळवली एस.टी.पी प्लान्ट जवळील व वसंतवाटीका समोरील मोकळया जागेवर मातीचा भराव करून हि जागा डंपींगसाठी वापरण्यात येणार आहे. या जागेच्या आजूबाजूला रहिवासी परिसर असल्याने नागरिकांना दुर्गंधीमुळे मोठा त्रास होऊ शकतो. शिवाय हि जागा शहरी भागामध्ये असल्याने सकाळ-संध्याकाळ नागरिकांची सततची रहदारी असून नागरिकांना डंपींगमुळे भविष्यात त्रास होणार आहे. ही बाब गंभीर असून नागरिकांच्या आरोग्या संदर्भात असल्याने हे काम त्वरित थांबवण्यात यावे. नाहीतर नागरिकांच्या आक्रोशाला सामोरे जावे लागेल.विठ्ठलवाडी स्टेशन समोरील जो डंपींग आहे तो डंपींग याठिकाणी शिफ्टींग करण्याचा प्रशासनाचा मानस आहे तो अत्यंत चुकीचा आहे. विठ्ठलवाडीचा छोटासा डंपींग असल्याने देखील नागरिकांना नाकावर रूमाल ठेवून जावे लागते अशी परिस्थिती आहे. याठिकाणी कर अदा करणारे रहिवाशी असून येथील नागरिकांना प्रशासनाचा एवढा त्रास होत असेल तर याची दाद कोणाकडे मागावी? असा सवाल येथील नागरिक विचारत आहेत. त्यामुळे या जागेवरील डंपींगचे काम बंद करून येथील नागरिकांना दिलासा देण्याची मागणी कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या महिला बाल कल्याण समिती सभापती संध्या तरे यांनी केडीएमसी आयुक्तांकडे केली आहे.

# प्रा.अविनाश ओक यांची आत्महत्या



• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : जेएसएम कॉलेज अलिबाग येथील माजी प्राध्यापक अविनाश ओक (65) यांनी रेल्वेखाली आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना बुधवारी (दि.5) दुपारच्या सुमारास घडली. पेण रेल्वे स्टेशन येथील रुळावर त्यांचा मृतदेह सापडला. यावेळी 'माझ्या आत्महत्तेला कोणालाही दोषी धरु नये', अशी सुसाईड नोट पोलिसांना त्यांच्याजवळ सापडली.

पेण येथील सरकारी रुग्णालयात ओक यांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले, असल्याची माहिती पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदिप बागुल यांनी बोलताना दिली. ही घटना दुपारी दीड ते दोन वाजण्याच्या सुमारास घडली. ही बातमी समजताच ओक यांचे निकटवर्तीय तसेच भाजपचे नेते किरिट सोमय्या पेणमधील रुग्णालयात दाखल झाले. ओक यांच्या पश्चात त्यांची पत्नी, मुलगा, सून आणि मुलगी असा परिवार आहे.

प्रा. ओक यांनी अलिबाग येथील जेएसएम महाविद्यालयामध्ये बरीच वर्ष प्राध्यापक म्हणून काम केले होते. ते अलिबाग-गोंधळपाडा येथे वास्तव्यास होते. पेण येथील गतीमंद मुलांसाठी काम करणारी आयडे केअर ही संस्था आहे. या संस्थेमध्ये ते सेवाभावपणे काम करण्यासाठी जात असत. बुधवारी देखील ते आयडे केअरमध्ये गेले होते. त्यांनतर आयडे केअरच्या स्वाती मोहिते यांनी त्यांना जेवणासाठी आग्रह केला. मात्र माझे पेणमध्ये काही काम आहे, असे सांगून ते निघून गेले, अशी माहिती स्वाती मोहिते यांनी दिली. त्यानंतर ते दुपारी तेथून निघाले आणि त्यांनी पेण रेल्वे स्टेशन येथे रेल्वेखाली येऊन आत्महत्या केली. त्यावेळी त्यांचा मोबाईल बंद हो आत्महत्या करण्यामागचे नेमके कारण समोर आले नाही. मात्र पेण पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# महावितरणच्या प्री - पेड मीटरला रहिवाशांचा विरोध



• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे: ठाण्यात ठिकठिकाणी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने जुने मीटर काढून प्रीपेड मीटर लावण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. खाजगी कामगारांकडून हे काम करून घेतले जात आहे. हळू हळू सर्वत्र हे मीटर लावण्यात येणार आहे. मीटर बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे. मोबाईल सिमकार्ड रिचार्ज प्रमाणे प्रीपेड वीज मीटर धारकांना आधी आपल्या खात्यावर आगाऊ पैसे भरावे लागणार आहे. त्यानंतर त्यांना वीज वापरता येणार आहे. म्हणजे आता रिचार्ज संपला तर वीज प्रवाह बंद करण्यात येणार आहे. घरातील बत्ती गुल होऊन वीज ग्राहकांना अंधारात बसावे लागणार आहे. सर्व सामान्य वीज ग्राहकांना हे सर्व अवघड होणार असून अन्यायकारक असल्याची भावना सर्व सामान्य वीज ग्राहकांची आहे. याला रहावाशी विरोध करत आहेत. त्यासाठी स्वराज्य सामाजिक संस्था लोकमान्यनगर, ठाणे व शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) यांचे वतीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, लोकमान्य - सावरकर नगर येथील महावितरण अधिकारी यांना आज दि.06 मार्च 2025 रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्यावतीने नव्याने बसवणार असलेल्या अन्यायकारक प्री - पेड मीटर लावण्यास विरोध असल्याचे निवेदन देण्यात आले.

यावेळी स्वराज्य संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय देवकर, शिवसेना विभाग प्रमुख राजीव शिरोडकर, प्रशांत सातपुते, नारायण भालेकर, चंद्रकांत पाटील, अशोक कुलकर्णी, आदित्य देवकर, परेश परब, शाहू कदम, विजय सावंत, हितेश साळुंखे, बाळा भाट, तलाश परब,अतुल धामापूरकर, संतोष रुमडे, तुकाराम वाडे, विश्वनाथ नायर, चंद्रकांत ससाणे, श्रीधर सकपाळ,अनिल चाळके, नरेंद्र तवटे, अनिल धुमाळ, साईनाथ सिंग, महेश केरकर तसेच महिला आघाडी शहर संघटक प्रमिला भांगे,भाग्यश्री लाड व हेमांगी पांचाळ आदी उपस्थित होते.

वीज वितरण कंपनीने मनमानी करून जबरदस्तीने सदर मीटर बसविण्याचा प्रयत्न केल्यास परिसरातील सर्व वीज ग्राहक, स्वराज्य सामाजिक संस्था आणि शिवसेना आंदोलनाच्या मार्गाने निषेध नोंदविणार आहे असा इशारा देण्यात आला.

# महिला पोलीस कर्मचाऱ्यांची मोफत वैद्यकीय तपासणी

• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून खडकपाडा पोलीस स्टेशनच्या वतीने महिला पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.




पोलिसांचे कामाचे अनियमित तास, कामाचा ताण तणाव तसेच कौटुंबिक जबाबदारी यातून स्वतःच्या प्रकृतीकडे त्यांना लक्ष द्यायला देखील वेळ मिळत नाही. प्रकृतीकडे दुर्लक्ष होते, त्यामुळे अचानक हार्ट अटॅक सारख्या घटना घडतात. त्यातल्या त्यात महिलांच्या बाबतीत तर ही बाब अत्यंत अवघड आहे. महिलांना आपल्या घर, संसार, मुलं बाळ बघून तारे वरची कसरत करीत आपली नोकरी करावी लागते. त्यामुळे त्यांना स्वतःच्या प्रकृतीकडेही लक्ष देता येत नाही. लहान सहान आजार सहन करण्याचे वरदान निसर्गाने स्त्रियांना जन्मतःच दिले असल्याने बहुतांश स्त्रिया छोटे मोठे आजार अंगावर काढतात आणि पुढे भविष्यात अशा छोट्या आजारांच स्वरूप मोठ्या प्रमाणात दिसू लागतं आणि तेव्हा फार उशीर झालेला असतो.

ही बाब लक्षात घेऊन खडकपाडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ अमरनाथ वाघमोडे यांनी पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला दिनाचे औचित्य साधून महिला दिनाच्या पूर्व संध्येला महिलां पोलीस अधिकारी व महीला पोलीस कर्मचारी यांच्यासाठी ओयेसिस हॉस्पिटल कल्याण येथे डॉ राजेश पाखरे, डॉ दयानंद देखणे, डॉ गणेश शिरसाठ, डॉ सुचित्रा तेलवणे तसेच डॉ भाग्यश्री पाखरे आणि सहकारी यांच्या सहकार्याने मोफत वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन केले होते.

यावेळी हृदयरोग, त्वचा, ऑर्थो तसेच महिलांचे आजार याविषयी तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करण्यात आली. खडकपाडा पोलीस स्टेशन नेमणुकीतील महिला पोलीस अधिकारी व महिला पोलिस अंमलदार यांनी आपल्या व्यस्त दिनक्रमातून स्वतः करिता वेळ काढून वैद्यकीय तपासणी शिबिराचा लाभ घेऊन तपासणी करून घेतली आणि आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना धन्यवाद दिले.

# नवीन संच मान्यता विरोधात शिक्षक परिषदेचे निवेदन

• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ च्या अनुषंगाने सर्व व्यवस्थापनाच्या नवीन शाळा सुरू करणे, वर्ग जोडणे त्या अनुषंगाने शाळांमधील संरचनात्मक बदल करणे आणि संच मान्यतेचे सुधारित निकष विहित करणे ,असा आदेश देण्यात आला आहे. या आदेशामुळे अनेक



ठिकाणी मुख्याध्यापक,विषय शिक्षक,प्राथमिक शिक्षक अतिरिक्त होत आहेत. तसेच कमी पटसंख्येच्या शाळा बंद होण्याची भीती असल्याने हा शासन आदेश तत्काळ रद्द करून पूर्वीप्रमाणेच शासन आदेशानुसार संच मान्यता करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्याकडे निवेदनातून केली आहे. याच अनुषंगाने महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग शाखा पेण त्यांच्या वतीने पेण तहसीलदार तानाजी शेजाळ आणि पेण गटविकास अधिकारी सोनल सूर्यवंशी यांना निवेदन देण्यात आले.

राज्य शासनाने संच मान्यतेचे नवीन निकष जारी केलेले आहेत. हे नवीन निकष ग्रामीण भागातील शाळांसाठी अन्यायकारक असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे यामुळे फार मोठे शैक्षणिक नुकसान होणार असल्याची माहिती पेण शाखेचे अध्यक्ष महेंद्र गायकवाड यांनी यावेळी दिली. यावेळी शिक्षक परिषदेचे महेंद्र पाटील, अंकुश पाटील, महेश म्हात्रे, विजय मिस्त्री, रामकृष्ण भोईर, नितीन पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांसाठी कंपोस्ट पिट बनवण्याचे प्रात्यक्षिक

• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : वासिंद पासून अवघ्या 5की. मी. असलेल्या मयंक दीपक चव्हाण कृषी पर्यटन केंद्र मौजे पळसोली येथे डॉक्टर पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत शेतकऱ्यांसाठी कंपोस्ट पिट बनवण्याचे प्रात्यक्षिक घेण्यात आले.

शेतकऱ्यांना उत्पादित भाजीपाला, भातशेती यांच्या उत्पादनासाठी योग्य मार्गदर्शन कंपोस्ट पिट बाबत माहिती





मिळावी यासाठी तालुका कृषी अधिकारी कल्याण यांच्या मार्गदर्शनाखाली मयंक दीपक चव्हाण कृषी पर्यटन केंद्र मौजे पळसोली येथे डॉक्टर पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत कंपोस्ट पिट बनवण्याचे प्रात्यक्षिक घेण्यात आले.

यावेळी इनोराव बायोटेक लिमिटेड कंपनी पुणे येथील अमर धायगुडे यांनी कंपोस्ट पीट कसा बनवायचा याबाबत मार्गदर्शन केले. तर कृषी पर्यवेक्षक विजय पाटील, कृषी सहायक प्रसाद भोकरे यांनी नैसर्गिक शेती विषयी माहिती दिली. सदर प्रशिक्षणाचे नियोजन तालुका तंत्र व्यवस्थापक वैशाली भापसे, दीपक चव्हाण, ज्ञानेश्वर चौधरी व ग्रामस्थ यांनी केले होते.

या प्रशिक्षणासाठी परिसरातील नैसर्गिक शेती गटातील अध्यक्ष, सचिव व प्रगतशील शेतकरी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते तर शेतकरी गटामार्फत कृषी अधिकाऱ्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

# ग्रामपंचायत डोहोळे वतीने महिला मेळाव्याचे आयोजन

• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : वासिंद येथील ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे या ग्रामपंचायत वतीने जागतिक महिला दिनानिमित्त व माझी वसुंधरा अभियान 5.0 या अनुषंगाने महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे या ग्रामपंचायत विभाग समितीने पुढाकार घेऊन जागतिक महिला दिनानिमित्त तसेच सध्या सुरू असलेल्या माझी वसुंधरा अभियान 5.0 या अनुषंगाने महिला मेळाव्याचे आयोजन केले आहे. शनिवार 8 मार्च रोजी ग्रामपंचायत कार्यालय येथे दुपारी पार पडणाऱ्या या मेळाव्यात शाळेतील विद्यार्थ्यांचे प्लास्टिक बंदी बाबत पथनाट्य, जलशुद्धीकरण व त्याचा पुर्नवापर बाबत प्रयोग प्रदर्शन तसेच ओला, सुका कचरा व्यवस्थापनसाठी डस्टबिन (कचरा पेटी) व वापरासाठी कापडी पिशवींचे वाटप करण्यात येणार असून यामध्ये माझी वसुंधरा अभियान जनजागृतीपर विविध बॅनर माध्यमातून देखावे व उपस्थित मान्यवर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

दरम्यान, या होणाऱ्या महिला मेळाव्यात ग्रामपंचायत विभागातील महिलांनी सहभाग घ्यावा असे आवाहन ग्रामपंचायत विभाग अधिकारी व समिती पदाधिकारी यांनी केले आहे.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024